Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। मंगळवार, दि. १६ जून २०२६ । वर्ष १ । अंक ७१ । पाने २।
DIGITAL EDITION

नशिराबाद येथे मनसेचा पर्यावरणाला सलाम!
(पान २ वर)

Selected

वाघुर धरणाचे पाणी ग्रामस्थांच्या दारी

जामनेर| अनेक वर्षांपासून भीषण पाणीटंचाईचा सामना करणाऱ्या पहूर पेठ, पहूर कसबे आणि परिसरातील ग्रामस्थांसाठी अखेर आनंदाची बातमी आली आहे. सात ते आठ वर्षांच्या सातत्यपूर्ण संघर्षानंतर वाघुर धरणाचे पाणी गावात दाखल झाले असून या ऐतिहासिक क्षणामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. आज गावात पोहोचलेले वाघुरचे पाणी हा केवळ पाणीपुरवठ्याचा टप्पा नसून दीर्घकाळ सुरू असलेल्या जनसंघर्षाचा आणि ग्रामस्थांच्या संयमाचा विजय मानला जात आहे. उन्हाळा सुरू होताच पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना मोठी कसरत करावी लागत होती. प्रत्येक घरासमोर टंचाईचे संकट उभे राहत असल्याने कायमस्वरूपी उपाययोजनेची मागणी सातत्याने केली जात होती. ही समस्या सोडवण्यासाठी शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला.

विधान परिषदेच्या उपसभापती निवडीसह पुरवणी मागण्यांवर चर्चा, विरोधी पक्षनेतेपद अद्याप रिक्त

पावसाळी अधिवेशनाचे बिगुल वाजले!

२२ जूनपासून राज्य विधिमंडळाचे कामकाज सुरू; अधिवेशन १० जुलैपर्यंत चालविण्याचा निर्णय

जन सम्राट टाईम्स

मुंबई : राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचे बिगुल अखेर वाजले असून येत्या २२ जूनपासून अधिवेशनाला सुरुवात होणार आहे. संसदीय कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत अधिवेशन १० जुलैपर्यंत चालविण्याचा निर्णय घेण्यात आला.

यंदाच्या अधिवेशनात पुरवणी मागण्या, विविध विधेयके आणि विधानपरिषदेच्या उपसभापतीपदाची निवड याकडे राजकीय वर्तुळाचे विशेष लक्ष लागले आहे. सोमवारी विधानभवनात पार पडलेल्या कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत अधिवेशनाच्या रूपरेषेवर चर्चा झाली. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सन २०२६-२७ च्या पुरवणी मागण्या सभागृहात सादर करण्यात येणार असून, त्यावर चर्चा करून पहिल्याच आठवड्यात मंजुरी देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. विधान परिषदेच्या माजी उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांचा कार्यकाळ १३ मे २०२५ रोजी संपुष्टात

आल्यापासून हे पद रिक्त आहे. सध्या सुरू असलेल्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांच्या निवडणुकांचे निकाल आणि अधिसूचना पूर्ण झाल्यानंतर उपसभापती निवडीची प्रक्रिया सुरू होणार आहे. राजकीय समीकरणांनुसार विधान परिषद सभापती आणि विधानसभा अध्यक्ष ही दोन्ही पदे भाजपकडे, तर विधानसभा उपाध्यक्षपद राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्याकडे असल्याने विधान परिषदेच्या उपसभापतीपदावर शिवसेनेचा दावा मजबूत मानला जात आहे. या पदासाठी डॉ. नीलम गोऱ्हे यांचे नाव आघाडीवर असल्याची चर्चा आहे.

दरम्यान, राज्य विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये सध्या विरोधी पक्षनेते नसल्याची परिस्थिती कायम आहे. १५व्या विधानसभा स्थापनेनंतर होणारे हे सलग सातवे अधिवेशन असून अद्याप विधानसभेच्या विरोधी पक्षनेतेपदाचा निर्णय झालेला नाही. विधान परिषदेत शिवसेना (ठाकरे गट) नेते अंबादास दानवे यांचा सदस्यत्वाचा कार्यकाळ गेल्या वर्षी संपल्यानंतर तेथील विरोधी पक्षनेतेपदही रिक्त झाले आहे. सध्याच्या राजकीय परिस्थितीचा विचार करता, या अधिवेशनातही विरोधी पक्षनेत्यांची नियुक्ती होण्याची शक्यता कमी असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे.

कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीस विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे तसेच संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित होते.

विरोधी पक्षनेत्याविना सातवे अधिवेशन

दरम्यान, राज्य विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये सध्या विरोधी पक्षनेते नसल्याची परिस्थिती कायम आहे. १५व्या विधानसभा स्थापनेनंतर होणारे हे सलग सातवे अधिवेशन असून अद्याप विधानसभेच्या विरोधी पक्षनेतेपदाचा निर्णय झालेला नाही. विधान परिषदेत शिवसेना (ठाकरे गट) नेते अंबादास दानवे यांचा सदस्यत्वाचा कार्यकाळ गेल्या वर्षी संपल्यानंतर तेथील विरोधी पक्षनेतेपदही रिक्त झाले आहे. सध्याच्या राजकीय परिस्थितीचा विचार करता, या अधिवेशनातही विरोधी पक्षनेत्यांची नियुक्ती होण्याची शक्यता कमी असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

शिरपूरात फळांच्या गोडाऊनला भीषण आग!

संसारोपयोगी साहित्य जळून खाक

जन सम्राट टाईम्स

शिरपूर | प्रतिनिधी: शिरपूर शहरातील भंडारी टाकी परिसरात एका फळांच्या गोडाऊनला दुपारच्या सुमारास भीषण आग लागून लाखो रुपयांचे नुकसान झाल्याची घटना घडली. या आगीत गोडाऊनमधील फळसाठा, एक दुचाकी तसेच संसारोपयोगी साहित्य पूर्णपणे जळून खाक झाले असून परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मिळालेल्या माहितीनुसार, भंडारी टाकी परिसरातील अशपाक बागवान यांच्या मालकीच्या फळांच्या गोडाऊनला अचानक आग लागली. काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केल्याने धुराचे मोठे लोट परिसरात पसरले आणि नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. घटनेची माहिती मिळताच शिरपूर अग्निशामक दलाचे जवान तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अग्निशामक दलाने अथक प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळवले. मात्र, तोपर्यंत गोडाऊनमधील फळांचा मोठा साठा, मोटारसायकल आणि इतर संसारोपयोगी साहित्य आगीत भस्मसात झाले होते. या घटनेत लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त

करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, संबंधित गोडाऊनमधील वीजपुरवठा गेल्या तीन महिन्यांपासून खंडित असल्याची माहिती मालक अशपाक बागवान यांनी दिली. त्यामुळे आग नेमकी कशामुळे लागली, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून संबंधित यंत्रणांकडून तपास सुरू आहे.

अग्निशमन विभागाकडून पुढील तपास सुरू

सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र अचानक लागलेल्या भीषण आगीमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून नागरिकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली होती. आग लागण्यामागील नेमके कारण शोधण्यासाठी संबंधित प्रशासन आणि अग्निशमन विभागाकडून पुढील तपास सुरू आहे.

विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर टाळून अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे : सुनील झंवर

स. न. झंवर विद्यालयात नवागत विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत; मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण

जन सम्राट टाईम्स

पाळधी | प्रतिनिधी: विद्यार्थ्यांनी शाळेत आल्यानंतर आपल्या अभ्यासावर पूर्ण लक्ष केंद्रित करावे आणि मोबाईलच्या अतिवापरापासून दूर राहावे. संस्थेचे माजी विद्यार्थी आज देश-विदेशात विविध उच्च पदांवर कार्यरत आहेत. त्यांच्या यशाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून विद्यार्थ्यांनी शिक्षणात प्रगती साधावी," असे आवाहन स. न. झंवर विद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष सुनील झंवर यांनी केले. पाळधी येथील स. न. झंवर विद्यालयात नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. शाळेचा परिसर रंगीबेरंगी फुगे, आकर्षक रांगोळ्या आणि तोरणांनी सजविण्यात आला होता. दीर्घ सुट्टीनंतर मित्र-मैत्रिणींना

भेटल्याचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसून येत होता. पाचवीत प्रवेश घेतलेल्या नवीन विद्यार्थ्यांचे शिक्षकांनी औक्षण करून स्वागत केले. त्यानंतर विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. यावेळी उपसरपंच निसार देशमुख, उद्योगपती अनिल कासट, शालेय समितीचे अध्यक्ष सुनील झंवर, मुख्याध्यापक एस. पी. पाटील आणि पर्यवेक्षक एस. एस. मणियार उपस्थित होते. याप्रसंगी गटशिक्षणाधिकारी भावना भोसले आणि केंद्रप्रमुख प्रमोद सोनवणे यांनी शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांचे पुष्प देऊन स्वागत केले तसेच शाळेतील विविध उपक्रमांची पाहणी केली. सुनील झंवर यांनी पालकांनाही आवाहन करताना सांगितले की, आपल्या पाल्याने शाळेत दिलेले अध्ययन आणि गृहपाठ नियमितपणे पूर्ण केला आहे की नाही, यावर पालकांनी बारकाईने लक्ष ठेवणे आवश्यक आहे. तसेच शिक्षकांनीही विद्यादानाचे पवित्र कार्य समर्पित भावनेने पार पाडून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील राहावे. कार्यक्रमाचा समारोप विद्यार्थ्यांना गोड खाऊ वाटप करून आणि सामूहिक राष्ट्रगीताने करण्यात आला. विशेष म्हणजे शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांची शंभर टक्के उपस्थिती आणि शिक्षकांचा उत्साह लक्षवेधी ठरला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बागले यांनी केले. यावेळी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अधिवेशनातील हौशे, नवशे, गवशांची जत्रा आवरणार : सभापती राम शिंदे

विक्रांत पाटील
जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: येत्या २२ जूनपासून सुरू होणाऱ्या महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात विधानभवन परिसरातील अनावश्यक गर्दीला आळा घालण्यासाठी यंदा प्रथमच 'डिजिटल प्रवेशपास' व्यवस्था लागू करण्यात येणार आहे. अधिवेशन सुरळीत, सुरक्षित आणि नियोजनबद्धरित्या पार पडावे यासाठी शिस्त व सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले असून, महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी या महत्त्वपूर्ण उपाययोजनेचे निर्देश दिले आहेत. या नव्या डिजिटल पास प्रणालीमुळे अधिवेशनादरम्यान होणाऱ्या अनावश्यक गर्दीवर प्रभावी नियंत्रण मिळवता येणार आहे.

पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी सभापती राम शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच एक उच्चस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीत ठरल्यानुसार, दैनंदिन कामकाजात कोणताही अडथळा येऊ नये म्हणून कार्यालयीन अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी येण्या-जाण्याकरिता पर्यायी प्रवेशद्वाराची व्यवस्था करण्यात आली आहे. प्रवेश नियंत्रण व्यवस्था अधिक काटेकोर करण्यासोबतच पोलीस विभागाने सुरक्षेच्या दृष्टिकोनातून पुरेसा आणि चोख बंदोबस्त तैनात ठेवावा, अशा कडक सूचनाही सभापतींनी या बैठकीत दिल्या आहेत. सुरक्षा आणि गर्दी नियंत्रणासोबतच इतर महत्त्वाच्या पायाभूत सोयी-सुविधांचाही या बैठकीत सविस्तर आढावा घेण्यात आला. पावसाळ्याचे दिवस लक्षात घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाने सुरक्षित मंडप उभारावेत आणि सार्वजनिक आरोग्य विभागाने सुसज्ज वैद्यकीय सुविधांसह अनुभवी डॉक्टरांची टीम तैनात ठेवावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. याशिवाय, अखंडित वीजपुरवठा, सुरक्षारक्षकांसाठी जेवणाची व्यवस्था, अन्नपदार्थांची गुणवत्ता तपासणी, सदस्यांसाठी अग्रक्रमाने रेल्वे आरक्षण आणि वार्ताकनासाठी येणाऱ्या पत्रकारांसाठी सुसज्ज मंडप व आवश्यक सुविधा पुरविण्याचे आदेशही सभापतींनी संबंधित विभागांना दिले आहेत.

वंजारी-खपाट ग्रामस्थांची अवैध हातभट्टी दारू बंद करण्याची मागणी

सामाजिक वातावरण बिघडत असल्याचा आरोप

जन सम्राट टाईम्स

धरणगाव | प्रतिनिधी : गुप ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या वंजारी-खपाट गावात सुरू असलेला अवैध हातभट्टी दारूचा व्यवसाय तातडीने आणि कायमस्वरूपी बंद करण्यात यावा, या मागणीसाठी ग्रामस्थांनी धरणगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांना निवेदन सादर केले आहे. गावातील सामाजिक वातावरण बिघडत असून तरुण पिढी व्यसनाच्या विळख्यात अडकत असल्याची चिंता नागरिकांनी व्यक्त केली. गावातील नागरिक व महिलांच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात

आले आहे की, अवैध हातभट्टी दारूच्या विक्रीमुळे गावातील अनेक युवक तसेच अल्पवयीन मुले व्यसनाच्या आहारी जात आहेत. यामुळे त्यांच्या आरोग्यावर तसेच भविष्यातील आयुष्यावर गंभीर परिणाम होत असून काही घटनांमध्ये जीवितहानी झाल्याचाही दावा ग्रामस्थांनी केला आहे. परिणामी अनेक कुटुंबांवर आर्थिक आणि सामाजिक संकट निर्माण झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित यंत्रणांनी तातडीने कारवाई करून गावातील अवैध हातभट्टी दारूचा व्यवसाय पूर्णपणे बंद करावा आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. यावेळी वंजारी गावाचे पोलीस पाटील दिलीप साळवे, खपाट गावाचे पोलीस पाटील गरबळ अहीरे, वंजारी गावाचे सरपंच शंकर पाटील, माजी सरपंच डॉ. दीपक पाटील, तुषार चौधरी, ग्रामपंचायत सदस्य ईश्वर काकडे, राजेश महाजन, युवासेना अध्यक्ष सुभाष बोरसे, गोपाल महाजन यांच्यासह गावातील अनेक नागरिक उपस्थित होते.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

महात्मा फुले हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन उत्साहात स्वागत

शाळेच्या पहिल्याच दिवशी पुस्तक, वह्या व गणवेशांचे वाटप

जन सम्राट टाईम्स

धरणगाव | प्रतिनिधी : धरणगाव शहरातील सुवर्ण महोत्सवी परंपरा लाभलेल्या महात्मा फुले हायस्कूलमध्ये नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी शाळा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेच्या पहिल्याच दिवशी नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले, तसेच सर्व विद्यार्थ्यांना पुस्तक, वह्या आणि गणवेशांचे वितरण करण्यात आले. शाळा प्रवेशोत्सव २०२६-२७ कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळेचे मुख्याध्यापक जे. एस. पवार यांनी भूषविले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक एच. डी. माळी यांनी केले. नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत करत त्यांना

शिक्षणाच्या प्रवासासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या हस्ते गणवेश देऊन त्यांचा उत्साह वाढविण्यात आला. दरवर्षीप्रमाणे यंदाही सामाजिक कार्यकर्ते दिनेशशेठ लोहार यांच्या पुढाकारातून शाळेतील सर्व विद्यार्थ्यांसाठी कांदापोहे आणि गुळाच्या जिलेबीचा अल्पोपहार आयोजित करण्यात आला.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा शाळेतील पहिला दिवस आनंददायी आणि संस्मरणीय ठरला. कार्यक्रमाला शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका एम. के. कापडणे, एम. बी. मोरे, एस. व्ही. आढावे, एस. एन. कोळी, पी. डी. पाटील, व्ही. टी. माळी, व्ही. पी. वऱ्हाडे, नूतन प्राथमिक विद्यामंदिरचे मुख्याध्यापक अतुल सूर्यवंशी, अरुण शिरसाठ, ग्रंथपाल गोपाल महाजन, लिपिक जे. एस. महाजन, पी. डी. बडगुजर, अशोक पाटील आणि जीवन भोई यांच्यासह शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी आणि शैक्षणिक वर्षाची सकारात्मक सुरुवात करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे पालक व उपस्थितांनी कौतुक केले.

शाळेतील पहिला दिवस आनंददायी

शाळा प्रवेशोत्सव २०२६-२७ कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळेचे मुख्याध्यापक जे. एस. पवार यांनी भूषविले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक एच. डी. माळी यांनी केले. नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत करत त्यांना शिक्षणाच्या प्रवासासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या हस्ते गणवेश देऊन त्यांचा उत्साह वाढविण्यात आला. दरवर्षीप्रमाणे यंदाही सामाजिक कार्यकर्ते दिनेशशेठ लोहार यांच्या पुढाकारातून शाळेतील सर्व विद्यार्थ्यांसाठी कांदापोहे आणि गुळाच्या जिलेबीचा अल्पोपहार आयोजित करण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा शाळेतील पहिला दिवस आनंददायी आणि संस्मरणीय ठरला. विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी आणि शैक्षणिक वर्षाची सकारात्मक सुरुवात करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे पालक व उपस्थितांनी कौतुक केले.

अमळनेर बसस्थानकातील अव्यवस्थेमुळे प्रवाशांची गैरसोय

जन सम्राट टाईम्स

अमळनेर | प्रतिनिधी : अमळनेर बसस्थानकातील अव्यवस्थेमुळे विशेषतः वयोवृद्ध नागरिक आणि महिला प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याची तक्रार समोर येत आहे. बसवर स्पष्ट मार्गफलक नसणे आणि कर्मचाऱ्यांकडून अपेक्षित सहकार्य न मिळाल्याने प्रवाशांची गैरसोय वाढत असल्याचे नागरिकांनी म्हटले आहे. मंगळवारी दुपारच्या वेळेत बसस्थानकावर निर्माण झालेली परिस्थिती अत्यंत निंदनीय असल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. दहा पेक्षा अधिक बसगाड्यांवर गंतव्यस्थानाचे नावच प्रदर्शित करण्यात आले नव्हते, तर किमान पाच ते दहा गाड्यांवर केवळ 'अमळनेर' असेच लिहिलेले असल्याने प्रवाशांमध्ये संभ्रम निर्माण झाला. काही बसमध्ये नावाची घडी दुमडून किंवा तात्पुरत्या स्वरूपात फलक लावण्याचा प्रयत्न केल्याने नेमकी कोणती बस कोणत्या मार्गावर जाणार आहे, याची माहिती मिळणे कठीण झाले. परिणामी अनेक प्रवासी, विशेषतः वयोवृद्ध नागरिक, भर उन्हात एका बसमधून दुसऱ्या बसकडे धावपळ करताना दिसून आले. काही कर्मचाऱ्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळत नसल्याचीही तक्रार प्रवाशांनी केली. त्यामुळे ग्रामीण भागातील तसेच बाहेरगावाहून आलेल्या नागरिकांना अधिक त्रास सहन करावा लागत असल्याचे सांगण्यात आले. प्रवाशांनी एसटी प्रशासनाकडे बसवर स्पष्ट आणि ठळक मार्गफलक लावणे, वेळापत्रकाची प्रभावी माहिती देणे तसेच कर्मचाऱ्यांनी प्रवाशांना आवश्यक मार्गदर्शन करावे, अशी मागणी केली आहे. विशेषतः उन्हाळा आणि पावसाळ्यात ज्येष्ठ नागरिक, महिला आणि दिव्यांग प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी बसस्थानकातील व्यवस्थेत तातडीने सुधारणा करण्याची आवश्यकता व्यक्त होत आहे.

‘स्मार्ट मीटरची सक्ती नको’; शिवसेनेचा महावितरणाला इशारा

चार वर्षांत तिसऱ्यांदा मीटर बदलण्याची वेळ

जन सम्राट टाईम्स

धुळे । प्रतिनिधी: धुळे शहरासह जिल्ह्यात महावितरणकडून स्मार्ट मीटर बसविण्यासंदर्भात ग्राहकांना एसएमएस व व्हॉट्सॲपद्वारे ४८ तासांची पूर्वसूचना दिली जात असल्याच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेने तीव्र आक्षेप नोंदवत या प्रक्रियेला विरोध दर्शविला आहे. ग्राहकांच्या संमतीशिवाय स्मार्ट मीटर बसविण्याचा प्रयत्न केल्यास व्यापक जनआंदोलन छेडण्याचा इशारा शिवसेनेने महावितरण प्रशासनाला दिला आहे. शिवसेनेच्या शिष्टमंडळाने अधीक्षक अभियंता जितेंद्र महाजन यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. या निवेदनात स्मार्ट मीटर बसविण्याची सध्याची प्रक्रिया नियमबाह्य व दिशाभूल करणारी असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

शिवसेनेच्या मते, केंद्र शासनाच्या १७ ऑगस्ट २०२१ च्या अधिसूचनेनुसार कोणत्याही ग्राहकावर सक्तीने स्मार्ट मीटर बसविण्याची तरतूद नाही. तसेच मुंबई उच्च न्यायालयातील जनहित याचिकेतील निर्देशांनुसार ग्राहकाच्या संमतीशिवाय मीटर बदलणे बेकायदेशीर ठरू शकते, असा दावा निवेदनात करण्यात आला आहे. याशिवाय विद्युत कायदा २००३ मधील कलम ५५ आणि एमईआरसी विद्युत पुरवठा संहिता २०२१ चा उल्लेख करत मीटर बदलासाठी १५ दिवसांची नोटीस अपेक्षित असताना केवळ ४८ तासांची सूचना ग्राह्य धरता येणार नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. निवेदनात अनेक महत्त्वाचे प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. ग्राहकांच्या संमतीशिवाय मीटर बदलण्याचा अधिकार महावितरणला आहे का, स्मार्ट मीटरमुळे वीजबिलात वाढ झाल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, तांत्रिक बिघाड किंवा चुकीच्या रीडिंगबाबत हमी दिली जाणार का, ग्रामीण भागातील नेटवर्क समस्येमुळे ही व्यवस्था प्रभावी ठरणार का, ग्राहकांच्या वापराच्या माहितीची डेटा सुरक्षा कशी राखली जाणार आणि स्मार्ट मीटर नको असलेल्या ग्राहकांसाठी पर्याय काय असेल.

अशा प्रश्नांची उत्तरे प्रशासनाने द्यावीत, अशी मागणी करण्यात आली. शिवसेनेने धुळे शहरातील वीज वितरण व्यवस्थेवरही नाराजी व्यक्त केली. वारंवार होणारा वीजपुरवठा खंडित होणे, उघड्या डीपी, लोंबकळणाऱ्या विद्युत तारा, कमी विद्युत भार आणि मूलभूत सुविधांचा अभाव यामुळे ग्राहक त्रस्त असल्याचे सांगत, “चार वर्षांत तिसऱ्यांदा मीटर बदलण्यापेक्षा आधी सेवा सुधाराव्यात,” अशी भूमिका मांडण्यात आली. महावितरणने ग्राहकांवर जबरदस्तीने स्मार्ट मीटर बसविण्याचा प्रयत्न केल्यास कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो आणि त्यातून उद्भवणाऱ्या परिस्थितीला प्रशासनच जबाबदार राहील, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे, महानगरप्रमुख धीरज पाटील, युवा नेते तेजस गोटे, प्रशांत भामरे, डॉ. अनिल पाटील, प्रभादेवी परदेशी, संगीता जोशी, जयश्री वानखेडे, अरुणा मोरे, सुनिता शिरसाट, शिवाजी शिरसाळे, कपिल लिंगायत, पंकज भारस्कर, सुरज भावसार, सागर निकम, सागर साळवे, छोटू गवळी, दीपक जाधव, गुलाब धोबी, तेजस सपकाळ यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

शहरातील वीज वितरण व्यवस्थेवर नाराजी

शिवसेनेच्या मते, केंद्र शासनाच्या १७ ऑगस्ट २०२१ च्या अधिसूचनेनुसार कोणत्याही ग्राहकावर सक्तीने स्मार्ट मीटर बसविण्याची तरतूद नाही. तसेच मुंबई उच्च न्यायालयातील जनहित याचिकेतील निर्देशांनुसार ग्राहकाच्या संमतीशिवाय मीटर बदलणे बेकायदेशीर ठरू शकते, असा दावा निवेदनात करण्यात आला आहे. याशिवाय विद्युत कायदा २००३ मधील कलम ५५ आणि एमईआरसी विद्युत पुरवठा संहिता २०२१ चा उल्लेख करत मीटर बदलासाठी १५ दिवसांची नोटीस अपेक्षित असताना केवळ ४८ तासांची सूचना ग्राह्य धरता येणार नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. निवेदनात अनेक महत्त्वाचे प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. ग्राहकांच्या संमतीशिवाय मीटर बदलण्याचा अधिकार महावितरणला आहे का, स्मार्ट मीटरमुळे वीजबिलात वाढ झाल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, तांत्रिक बिघाड किंवा चुकीच्या रीडिंगबाबत हमी दिली जाणार का, ग्रामीण भागातील नेटवर्क समस्येमुळे ही व्यवस्था प्रभावी ठरणार का, ग्राहकांच्या वापराच्या माहितीची डेटा सुरक्षा कशी राखली जाणार आणि स्मार्ट मीटर नको असलेल्या ग्राहकांसाठी पर्याय काय असेल. अशा प्रश्नांची उत्तरे प्रशासनाने द्यावीत, अशी मागणी करण्यात आली. शिवसेनेने धुळे शहरातील वीज वितरण व्यवस्थेवरही नाराजी व्यक्त केली.

बोरी मध्यम प्रकल्पातून पारोळा शहरासह ग्रामीण भागाच्या पाणीपुरवठ्याचे नियोजन

आ.अमोल पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक

जन सम्राट टाईम्स

पारोळा । प्रतिनिधी :पारोळा शहरासह बोरी मध्यम प्रकल्पावर अवलंबून असलेल्या ग्रामीण भागातील नागरिकांना आगामी काळात पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवू नये, यासाठी आमदार ॲड. अमोलदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. बैठकीत तामसवाडी येथील बोरी मध्यम प्रकल्पातून जून ते सप्टेंबर २०२६ या कालावधीसाठी उपलब्ध जलसाठा आणि त्याच्या नियोजनाचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

जलसंपदा विभागाकडून प्राप्त माहितीनुसार यंदा एल-निनो परिस्थितीचा परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. पारोळा शहरासाठी आवश्यक पाणी आरक्षित ठेवण्यात आले असून भविष्यात शहरवासीयांना पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने राबविण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. बैठकीत बोरी मध्यम प्रकल्पावर अवलंबून असलेल्या ग्रामीण भागातील गावांच्या पाणीपुरवठा व्यवस्थेचाही सखोल आढावा घेण्यात आला. उपलब्ध जलसाठा, आगामी पावसाळ्यापूर्वीची परिस्थिती, पाणीपुरवठ्याचे व्यवस्थापन आणि आपत्कालीन नियोजन यासंदर्भात सविस्तर चर्चा झाली. नागरिकांना नियमित आणि सुरळीत पाणीपुरवठा मिळावा यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करण्याचे निर्देश आमदार अमोलदादा पाटील यांनी दिले. यावेळी लोकनियुक्त नगराध्यक्ष चंद्रकांतदादा पाटील, शिवसेनेचे शहरप्रमुख, गटनेते तथा नगरसेवक अमृतभाऊ चौधरी, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख तथा नगरसेवक मनिषभाऊ पाटील, नगरसेवक तथा पाणीपुरवठा सभापती मनोजभाऊ जगदाळे, उपगटनेते तथा नगरसेवक पंकजभाऊ मराठे, माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक दिपक अनुष्ठान, बोरी मध्यम प्रकल्पाचे उपअभियंता सिद्धार्थ पाटील, तामसवाडी शाखा अधिकारी प्रीतम काकडे, नगरपरिषदेचे बांधकाम अभियंता सुमित पाटील, पाणीपुरवठा अभियंता संकेत कारले यांच्यासह संबंधित अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते. पारोळा शहर आणि परिसरातील गावांना भविष्यात पिण्याच्या पाण्याची कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधी संयुक्तपणे नियोजनबद्ध पद्धतीने कार्यरत असून आवश्यक त्या सर्व उपाययोजना वेळेत राबविण्यात येतील, असा विश्वास बैठकीत व्यक्त करण्यात आला.

आपत्कालीन नियोजन यासंदर्भात चर्चा

भविष्यात शहरवासीयांना पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने राबविण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. बैठकीत बोरी मध्यम प्रकल्पावर अवलंबून असलेल्या ग्रामीण भागातील गावांच्या पाणीपुरवठा व्यवस्थेचाही सखोल आढावा घेण्यात आला. उपलब्ध जलसाठा, आगामी पावसाळ्यापूर्वीची परिस्थिती, पाणीपुरवठ्याचे व्यवस्थापन आणि आपत्कालीन नियोजन यासंदर्भात सविस्तर चर्चा झाली.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

जबरीचोरीतील दोघे सराईत गुन्हेगार जेरबंद

कार, रिक्षासह सात दुचाकी जप्त

जन सम्राट टाईम्स

धुळे। प्रतिनिधी : धुळे शहरातील चाळीसगाव रोड परिसरात झालेल्या जबरीचोरीच्या गुन्ह्याचा छडा लावत चाळीसगाव रोड पोलिसांनी दोन सराईत गुन्हेगारांना अटक करून त्यांच्या ताब्यातून कार, रिक्षा आणि सात मोटारसायकलींसह एकूण ९ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या कारवाईमुळे जबरीचोरी आणि चोरीचे सहा गुन्हे उघडकीस आले असून तिसऱ्या फरार आरोपीचा शोध सुरू आहे. १२ जून २०२६ रोजी सकाळच्या सुमारास मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३ वरील चाळीसगाव रोड चौफुलीपुढील साई निवारा परिसरात फिर्यादी विलास दामू पठारे (रा. बनपिंपरी, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर) यांच्याकडील मोबाईल फोन आणि रोख रक्कम असा एकूण १५ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल अज्ञात आरोपींनी जबरदस्तीने हिसकावून नेला होता. याप्रकरणी चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचा तपास सुरू असताना चाळीसगाव रोड पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक सुरेशकुमार घुसर यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे फैजान अहमद मुजम्मील अन्सारी ऊर्फ ‘इन्या’ (वय २१, रा. हाजी नगर, कबीरगंज, धुळे) आणि शाहीद मुख्तार शेख (रा. अंबिकानगर, धुळे) यांना जनता सोसायटी, इसहाक मशिदीजवळील वडजाई रोड परिसरातून ताब्यात घेण्यात आले. सखोल चौकशीत दोन्ही आरोपींनी आणखी एका साथीदाराच्या मदतीने सदर जबरीचोरी केल्याची कबुली दिली. तसेच दोंडाईचा, आझादनगर आणि चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील पूर्वी केलेल्या चोरीच्या गुन्ह्यांचीही माहिती दिली.

एनडीपीएस कायद्याअंतर्गत 16 गुन्ह्यांची नोंद

आरोपींच्या कबुलीजबाबानुसार चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून फरार साथीदाराचा शोध सुरू आहे. दरम्यान, अटक करण्यात आलेला आरोपी फैजान अहमद मुजम्मील अन्सारी ऊर्फ इन्या याच्याविरुद्ध यापूर्वीच जबरीचोरी, चोरी आणि एनडीपीएस कायद्याअंतर्गत १६ गुन्ह्यांची नोंद असून जामिनावर सुटल्यानंतर पुन्हा गुन्हे करण्याची त्याची पद्धत असल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे.

नव्या शैक्षणिक वर्षाची नवी उमेद : शाळा म्हणजे व्यक्तिमत्त्व घडवणारे संस्कारमंदिर

जून महिना सुरू झाला की प्रत्येक विद्यार्थ्याच्या आयुष्यात एका नव्या प्रवासाची सुरुवात होते. दीड-दोन महिन्यांच्या उन्हाळी सुट्टीनंतर पुन्हा एकदा शाळेची घंटा वाजते आणि परिसरात चैतन्याचे वातावरण निर्माण होते. काही विद्यार्थ्यांना सुट्टी आणखी वाढावी असे वाटत असते, तर अनेक जण नवीन वर्ग, नवीन पुस्तके आणि मित्रांच्या भेटीसाठी आतुर झालेले असतात. नवीन शैक्षणिक वर्ष म्हणजे नव्या संधी, नवी स्वप्ने आणि नव्या ध्येयांची सुरुवात. नव्या वर्गात प्रवेश करताना पाठीवरचे नवीन दप्तर, कोऱ्या पुस्तकांचा दरवळणारा सुगंध आणि वर्गात होणारी पहिली हजेरी प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनात एक वेगळाच उत्साह निर्माण करते. या सर्व नवलाईमध्ये एक गोष्ट मात्र कायम असते आणि ती म्हणजे आपले जिवलग मित्र. उन्हाळी सुट्टीतील आठवणी, अनुभव आणि गमतीजमती पुन्हा एकमेकांशी शेअर करण्याचा आनंद शब्दांत मांडता येणार नाही. परंतु शाळा म्हणजे केवळ आनंद, खेळ आणि मैत्रीचे ठिकाण नाही. शाळा ही आपल्या आयुष्याला योग्य दिशा देणारी, शिस्त, संस्कार आणि जबाबदारी शिकवणारी संस्था आहे. येथे आपण फक्त पाठ्यपुस्तकांतील धडे शिकत नाही, तर जीवन जगण्याची कला, चांगले वर्तन, वेळेचे महत्त्व आणि समाजात आदर्श नागरिक म्हणून कसे वागावे याचेही शिक्षण घेत असतो. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये शिक्षकांचे योगदान अत्यंत मोलाचे असते. उन्हाळी सुट्टीतही आपले विद्यार्थी नव्या जोमाने परत यावेत आणि त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव मिळावा, यासाठी शिक्षक सातत्याने नियोजन करत असतात. विद्यार्थ्यांच्या यशामागे त्यांच्या मेहनतीइतकाच शिक्षकांचा आशीर्वाद, मार्गदर्शन आणि प्रेरणाही महत्त्वाची असते. म्हणूनच प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या गुरुजनांविषयी मनात नितांत आदर बाळगला पाहिजे. त्यांच्या सूचनांचे प्रामाणिकपणे पालन करून ज्ञानाच्या मार्गावर पुढे जात राहणे हीच त्यांच्याप्रती खरी कृतज्ञता ठरेल. या नव्या शैक्षणिक वर्षात प्रत्येक विद्यार्थ्याने नियमित अभ्यास, शिस्त, प्रामाणिकपणा आणि सकारात्मक विचार यांचा स्वीकार करून स्वतःला एक उत्तम नागरिक आणि आदर्श व्यक्ती म्हणून घडविण्याचा संकल्प करूया.

जयहिंद!

-विजयकुमार पाटील

कवठळ ग्रामपंचायतीतील कथित भ्रष्टाचाराच्या तक्रारीला पाच महिने; चौकशी अद्याप रखडली

जन सम्राट टाईम्स

शहादा । प्रतिनिधी : नंदुरबार जिल्ह्यातील शहादा पंचायत समितीअंतर्गत येणाऱ्या मौजे कवठळ (ता. शहादा) ग्रामपंचायतीतील कथित आर्थिक गैरव्यवहाराच्या तक्रारीवर तब्बल पाच महिने उलटूनही ठोस चौकशी न झाल्याने स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या प्रकरणात प्रशासनाकडून होत असलेल्या विलंबामुळे विविध स्तरांवर प्रश्न उपस्थित केले जात असून निष्पक्ष चौकशीची मागणी जोर धरत आहे. माहितीनुसार, ५ जानेवारी २०२६ रोजी शहादा पंचायत समितीच्या गट विकास अधिकाऱ्यांकडे ग्रामपंचायतीतील सन २०२३-२४ आणि २०२४-२५ या कालावधीत झालेल्या विकासकामांबाबत लेखी तक्रार दाखल करण्यात आली होती. तक्रारीत १५ वा वित्त आयोग निधी, पेसा निधी, घनकचरा व्यवस्थापन निधी तसेच इतर शासकीय योजनांतील कामांमध्ये कथित आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. तक्रारदारांनी संबंधित कामांची माहिती, आर्थिक व्यवहारांशी संबंधित कागदपत्रे, बिले आणि छायाचित्रांसह सखोल चौकशी करून जबाबदारांवर प्रशासकीय कारवाई करण्याची मागणी केली होती. मात्र, पाच महिन्यांनंतरही चौकशीबाबत कोणतीही ठोस प्रगती झालेली नसल्याचा दावा करण्यात येत आहे. या प्रकरणावरून काही नागरिकांनी पंचायत समिती प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. ग्रामपंचायतींमधील भ्रष्टाचाराच्या तक्रारींकडे गांभीर्याने पाहिले जात नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात असून, संबंधित आरोपांची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी व्हावी, अशी मागणी पुढे येत आहे. तक्रारदारांनी यापूर्वीच इशारा दिला होता की, कथित गैरव्यवहाराची सखोल चौकशी करून दोषींवर योग्य कारवाई न झाल्यास जिल्हा परिषद कार्यालय, नंदुरबार येथे आंदोलन व उपोषण करण्यात येईल. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका काय आहे, चौकशीसाठी स्वतंत्र समिती नेमली जाणार का आणि तक्रारीवरील निर्णय कधी होणार, याकडे शहादा तालुक्यासह संपूर्ण नंदुरबार जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

नशिराबाद येथे मनसेचा पर्यावरणाला सलाम!

‘झाडे लावा, झाडे जगवा’चा संदेश

जन सम्राट टाईम्स

नशिराबाद | प्रतिनिधी: महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे यांच्या ५९ व्या वाढदिवसानिमित्त नशिराबाद येथे मनसेच्या वतीने पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. वाढदिवसाच्या निमित्ताने जल्लोष, फटाक्यांची आतषबाजी किंवा हार-तुरे याऐवजी वृक्षारोपण करून समाजाला सकारात्मक संदेश देण्याचा निर्णय मनसे कार्यकर्त्यांनी घेतला. या उपक्रमामुळे परिसरात पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृतीचे वातावरण निर्माण झाले. राजसाहेब ठाकरे यांनी वाढदिवसानिमित्त मुंबईत येऊन शुभेच्छा देण्याऐवजी प्रत्येक कार्यकर्त्याने आपल्या गावात आणि परिसरात वृक्षारोपण करावे, असे आवाहन केले होते. त्यांच्या या संदेशाला प्रतिसाद देत नशिराबाद शहरातील मनसे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन विविध ठिकाणी वृक्षारोपण केले. यावेळी केवळ रोपे लावण्यापुरते न थांबता, त्यांचे नियमित संगोपन करून ती जगविण्याची सामूहिक प्रतिज्ञाही उपस्थितांनी घेतली.‘झाडे लावा, झाडे जगवा’ हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून देत मनसे कार्यकर्त्यांनी पर्यावरण संरक्षणाची सामाजिक जबाबदारी अधोरेखित केली. वाढते प्रदूषण, बदलते हवामान आणि कमी होत चाललेले हरित क्षेत्र लक्षात घेता प्रत्येक नागरिकाने वृक्ष लागवडीसह त्यांचे संवर्धन करणे आवश्यक असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. या उपक्रमात मनसेचे जिल्हाध्यक्ष मुकुंदा रोटे यांच्यासह शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे विनायक धर्माधिकारी, विवेक दादा नाईक, मनसे नशिराबाद शहराध्यक्ष जितेंद्र बराटे, सुभाष काका पवार, दिलीप दादा मिस्तरी, शुभम भावसार, विशाल पाटील, पियुष जोशी, गणेश कुंभार, गोपाल भारुडे, राकेश बिऱ्हाडे, रितेश बराटे, संतोष कुंभार तसेच मनसेचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि निसर्गप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. राजकीय कार्यक्रमांनाही सामाजिक बांधिलकीची जोड देत पर्यावरण रक्षणासाठी पुढाकार घेण्याचा आदर्श या निमित्ताने नशिराबाद मनसेने घालून दिल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. वृक्षारोपणासारख्या उपक्रमांमुळे समाजात पर्यावरणाबाबत जागरूकता वाढून भविष्यात हरित महाराष्ट्राच्या निर्मितीस चालना मिळेल, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

धुळ्यात मनपा शाळेत विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत

शाळेच्या पहिल्याच दिवशी नवप्रवेशित विद्यार्थ्यांसाठी अनोखा उपक्रम

जन सम्राट टाईम्स

धुळे । प्रतिनिधी: उन्हाळी सुट्टीनंतर सोमवारपासून धुळे जिल्ह्यातील सर्व शाळांची घंटा पुन्हा एकदा वाजली. शाळेच्या पहिल्याच दिवशी धुळे महानगरपालिकेच्या शाळा क्रमांक ८ मध्ये नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे आगळ्यावेगळ्या पद्धतीने स्वागत करण्यात आले. धुळे महानगरपालिकेचे उपायुक्त हेमंत निकम यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले, तर पहिलीच्या विद्यार्थ्यांना शालेय गणवेश, वह्या, पुस्तके आणि दप्तरांचेही वितरण करण्यात आले. शाळेत प्रवेश करताच झालेल्या या प्रेमळ स्वागतामुळे चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. दीड ते दोन महिन्यांच्या उन्हाळी सुट्टीनंतर शाळेत परतलेल्या विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. यावेळी शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यात आले. विशेष म्हणजे, शिक्षकांनीही स्वखर्चातून विद्यार्थ्यांसाठी दप्तरांची व्यवस्था करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले. धुळे महानगरपालिका आयुक्तांच्या निर्देशानुसार शहरातील सर्व मनपा शाळांमध्ये नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी विविध अधिकाऱ्यांवर जबाबदारी सोपविण्यात आली होती. त्याचाच एक भाग म्हणून शाळा क्रमांक ८ येथे हा उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. यावेळी बोलताना उपायुक्त हेमंत निकम यांनी सांगितले की, यंदा मोठ्या संख्येने पालकांनी महानगरपालिका शाळांवर विश्वास दाखवत आपल्या पाल्यांचे प्रवेश घेतले आहेत. हा विश्वास कायम राखण्यासोबतच विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी आवड निर्माण व्हावी आणि शाळेच्या पहिल्याच दिवशी त्यांना सकारात्मक वातावरण मिळावे, या उद्देशाने स्वागत व साहित्य वितरणाचा उपक्रम आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या आनंदी चेहऱ्यांनी आणि पालकांच्या समाधानाने शाळेच्या नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात उत्साहपूर्ण वातावरणात झाली.

सामाजिक बांधिलकीचे घडविले दर्शन

धुळे महानगरपालिकेचे उपायुक्त हेमंत निकम यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले, तर पहिलीच्या विद्यार्थ्यांना शालेय गणवेश, वह्या, पुस्तके आणि दप्तरांचेही वितरण करण्यात आले. शाळेत प्रवेश करताच झालेल्या या प्रेमळ स्वागतामुळे चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. दीड ते दोन महिन्यांच्या उन्हाळी सुट्टीनंतर शाळेत परतलेल्या विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. यावेळी शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यात आले. विशेष म्हणजे, शिक्षकांनीही स्वखर्चातून विद्यार्थ्यांसाठी दप्तरांची व्यवस्था करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले.